# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २८२ - २२** **दिनांक १९/०९/२०२२**

## मारण्याची धमकी देऊन महिलेवर अतिप्रसंग करणा-या अनोळखी आरोपीतास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा व गुन्हे शाखा कक्ष-१ यांनी अवघ्या १२ तासांत निष्पन्न करुन केली अटक.

नवघर पोलीस ठाणे हद्दिमध्ये दिनांक १७.०९.२०२२ रोजी रात्री ००.३० वाजताचे सुमारास एक महिला भाईंदर रेल्वे स्टेशनसमोर शिवकृपा मेडिकलजवळ रोडचे बाजुला रिक्षास्टॅन्डजवळ सिगारेट विकण्यासाठी उभी असताना एका अनोळखी रिक्षा चालकाने सर्व सिगारेट विकत घेण्याचा बहाणा करून महिलेला रिक्षातून घेऊन जाऊन भाईन्दर पुर्व, केबीन फाटक रोड येथे गल्लीतील अंधारात रिक्षा थांबवून फिर्यादीस मारण्याची धमकी देउन तिचे इच्छेविरुध्द जबरदस्तीने बलात्कार केल्याने नवघर पोलीस ठाणे येथे I गु.रजि.नं. ७००/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७६, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील अनोळखी आरोपीबाबत कोणताही ठावठिकाणा नसल्यामुळे गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे शाखेने तपास सुरु केला. सदर आरोपीने पिडित महिलेस ज्या ठिकाणावरुन रिक्षातुन घेवुन गेला त्या ठिकाणाचा बारकाईने पाहणी व तांत्रिक विश्लेषण करून त्या रिक्षाचा नंबर प्राप्त करून रिक्षा मालक याचा शोध घेऊन रिक्षाचा मालक याचेकडे तपास केला. सदरचा गुन्हा घडला त्या कालावधीमध्ये त्याची नमुद रिक्षा हि कोणाच्या ताब्यात होती याबाबत माहिती प्राप्त केली. सदर माहितीचे आधारे नमुद रिक्षाचालक याचे ठाव ठिकाणाबाबत अधिक माहिती प्राप्त करून त्याचा शोध घेतला व त्यास ताब्यात घेवून त्याच्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता त्याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयाचे तपासकामी इसम नामे अनिल कुमार ऊर्फ कुंदन ओमप्रकाश मिश्रा, वय २८ वर्षे, रा. नवघर ता. जि. ठाणे यास ताब्यात घेऊन गुन्हयाचे तपास कामी अटक करण्यात आलेली असून त्याची दिनांक २१/०९/२२ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड प्राप्त करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/नितीन बेंद्रे हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री. विजयकांत सागर, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), अती. कार्य. पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.नि. राहुल राख, सपोनि. नितीन बेंद्रे, सपोनि. कैलास टोकले, सपोनि. पुष्पराज सुर्वे, (गुन्हे शाखा कक्ष १) पो.हवा. मनोहर तावरे, राजवीरसिंग संधू, पो.अं. प्रविणराज पवार, सतिश जगताप, सुशील पवार, तसेच गुन्हे शाखा कक्ष-१ चे स.फौ. वाडिले, पो.हवा. संजय शिंदे, बाबासाहेब गर्जे, लांडगे, प्रशांत विस्पुते, पो.ना. सचिन सावंत, पो.अं. समीर यादव, सनी सुर्यवंशी यांनी केलेली आहे.

---ooo---